पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ११

**सभावृत्तांत**

दिनांक - **०५/१०/२०१८** वेळ - सकाळी **११.३०** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा **शुक्रवार** दिनांक **०५/१०/२०१८** रोजी सकाळी **११.३०** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.माधुरी कुलकर्णी ऊर्फ मोनाताई - **सभापती**
२. मा.पवार मनिषा प्रमोद
३. मा.उषा ऊर्फ माई मनोहर ढोरे
४. मा.लांडगे राजेंद्र किसनराव
५. मा.सागर बाळासाहेब गवळी
६. मा.पवळे सुमनताई मधुकर
७. मा.संगिता(नानी)प्रभाकर ताम्हाणे
८. मा.कदम निकिता अर्जुन
९. मा.अड.सचिन सुरेश भोसले

या शिवाय मा.चितळे – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.सुपेकर, मा.मोरे, – कार्यकारी अभियंता, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

----------

विषय क्र.४) ब प्रभागांतर्गत खड्डे, ट्रेंचेस, कोल्डमिक्स पध्दतीने भरणेचे कामास कामाची सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत - मा.मनिषा पवार, मा.उषा ऊर्फ माई ढोरे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५) मा.विधी समिती सभा ठराव क्र.३७ दि.१४/०९/२०१८ मध्ये दुरुस्ती करणेबाबत - मा.मनिषा पवार, मा.उषा ऊर्फ माई ढोरे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६) पिं.चिं.म.न.पाच्या सर्व विषय समित्यांची नियमावली व कायदेविषयक धोरण तयार करण्यासाठी मा.विधी समितीची मान्यता घेणेबाबत – मा.सचिन भोसले, मा.राजेंद्र लांडगे यांचा प्रस्ताव.

----------

दिनांक २१/०९/२०१८ रोजी झालेल्या सभेचा (**कार्यपत्रिका क्रमांक १०**) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

**----------**

ठराव क्रमांक - ४७ विषय क्रमांक - ०१
दिनांक - ०५/१०/२०१८ विभाग – 'अ' क्षेत्रिय कार्यालय
सुचक : मा.सागर गवळी अनुमोदक : मा.राजेंद्र लांडगे
संदर्भ – मा.अति. आयुक्त (२) यांचे पत्र क्र.अक्षे/स्था/कावि/०६/६८/२०१८, दि.२५/०९/२०१८

विषय – स्वच्छ भारत अभियानांतर्गत प्रभाग क्र.१९ मधील सार्वजनिक स्वच्छतागृहे अद्यावत करणे व नुतनीकरण करणेकामी प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

विषय क्रमांक ०१ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ४८ विषय क्रमांक - ०२
दिनांक - ०५/१०/२०१८ विभाग – 'अ' क्षेत्रिय कार्यालय
सुचक : मा.उषा ऊर्फ माई ढोरे अनुमोदक : मा.मनिषा पवार
संदर्भ – मा.अति. आयुक्त (२) यांचे पत्र क्र.अक्षे/स्था/कावि/०७/०४/२०१८, दि.२५/०९/२०१८

विषय – स्वच्छ भारत अभियानांतर्गत प्रभाग क्र.१४ मधील सार्वजनिक स्वच्छतागृहे अद्यावत करणे व नुतनीकरण करणेकामी प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

विषय क्रमांक ०२ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ४९ विषय क्रमांक - ०३
दिनांक - ०५/१०/२०१८ विभाग – 'अ' क्षेत्रिय कार्यालय
सुचक : मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक : मा.सागर गवळी
संदर्भ – मा.अति. आयुक्त (२) यांचे पत्र क्र.अक्षे/स्था/कावि/०५/१०३/२०१८, दि.२५/०९/२०१८

विषय – स्वच्छ भारत अभियानांतर्गत प्रभाग क्र.१५ मधील सार्वजनिक स्वच्छतागृहे अद्यावत करणे व नुतनीकरण करणे.

विषय क्रमांक ०३ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक - ५० विषय क्रमांक - ०४

दिनांक - ०५/१०/२०१८

सुचक : मा.मनिषा पवार अनुमोदक : मा.उषा ऊर्फ माई ढोरे

संदर्भ – मा.मनिषा पवार, मा.उषा ऊर्फ माई ढोरे यांचा प्रस्ताव –

ब प्रभागांतर्गत खड्डे, ट्रेंचेस कोल्डमिक्स पध्दतीने भरणे या कामास सन २०१७-१८ च्या अंदाजपत्रकात र.रु.२७,००,०००/- इतकी प्रशासकीय मान्यता आहे. तथापि कामाची व्याप्ती वाढल्यामुळे सदर कामास सुधारीत प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक आहे. तरी सदर कामास सुधारीत र.रु.५०,००,०००/- (वाढीव प्रशासकीय मान्यता र.रु.२३,००,०००/-) इतकी करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक - ५१ विषय क्रमांक – ०५

दिनांक – ०५/१०/२०१८

सुचक : मा.मनिषा पवार अनुमोदक : मा.उषा ऊर्फ माई ढोरे

संदर्भ – मा.मनिषा पवार, मा.उषा ऊर्फ माई ढोरे यांचा प्रस्ताव –

मा.विधी समिती सभा ठराव क्र.३७, दिनांक १४/०९/२०१८ मधील “ मा.आयुक्त यांची मागणी असली तरी ” या वाक्यापुढील सर्व मजकूर वगळून त्या ऐवजी “ उक्त भंगार साहित्याची विक्री लिलावाने करणे ऐवजी विभागाकडून चालू बाजारभावानुसार काढलेल्या भंगार साहित्याचे एकूण अंदाजित मुल्यापेक्षा ५ टक्के अधिक (जीएसटी सह) दराने मे.स्टील इंडिया कंपनी (STEEL INDIA COMPANY) या ठेकेदारास थेट पध्दतीने उक्त भंगार साहित्याची विक्री करण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.” असा मजकूर समाविष्ट करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ५२ विषय क्रमांक – ०६

दिनांक – ०५/१०/२०१८

सुचक : मा.सचिन भोसले अनुमोदक : मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.सचिन भोसले, मा.राजेंद्र लांडगे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये अनेक समित्या शहर विकासासाठी गठीत करणेत आलेल्या आहेत. सर्व समित्या शहरातील नागरिकांसाठी विविध योजना राबवित आहेत. परंतु त्या धोरणांचे जे निकष ठरविण्यात येतात ते मा.विधी समिती सभेच्या मान्यतेने ठरविण्यात

यावेत. शहरातील नागरिकांना या योजनांचा लाभ देण्यासाठी महत्वाची नियमावली तयार करण्यात येत असते व अटी देखील ठरविण्यात येतात. त्या सर्व विषयांची / नियमांची मंजूरी मा.विधी समितीद्वारे देण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच त्यानुसार सर्व विभागांना कळविणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(माधुरी कुलकर्णी ऊर्फ मोनाताई)**
**सभापती**
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/६६४/२०१८
दिनांक : ०५/१०/२०१८



**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.